Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (चंद्रपूर) वर्ष ०३ • अंक-३०९ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.८ ऑक्टोबर २०२६ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# दुष्काळ निवारणासाठी सरकार ॲक्शन मोडमध्ये

## पाणी, चारा अन् कर्जाबाबत मोठे निर्णय

**मुंबई (वृत्तसंस्था)**

शेतकऱ्यांना कर्जवाटप करताना बँकांकडून होणाऱ्या विलंबाबाबत बावनकुळे यांनी तीव्र असंतोष व्यक्त केला. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज पुरवले पाहिजे आणि प्रत्येक जिल्ह्याची चाऱ्याची बॅलन्स शीट तयार केली पाहिजे, ज्यामुळे कुठे किती चारा शिल्लक आहे याचा स्पष्ट अंदाज येईल, असे सांगितले. त्यावर बावनकुळे यांनी बँकांच्या अडमुठ्या धोरणावर टीका करत राज्यात आतापर्यंत केवळ ८ टक्केच पीक कर्जवाटप झाल्याचे स्पष्ट केले. बँकांनी शेतकऱ्यांकडे वारंवार कागदपत्रांची मागणी करू नये, एकदा पीक कर्ज घेतले असल्यास पुन्हा कागदपत्रे मागू नयेत, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा खाजगी बँकेने अथवा खाजगी फायनान्सरने या काळात शेतकऱ्यांना कर्जभरण्यासाठी फोन करून वेठीस धरू नये. असे प्रकार घडल्यास कडक कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला. याप्रकरणी मुख्य सचिवांच्या स्तरावर तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बैठका घेऊन प्रश्न सोडवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कर्जमाफीतील वारसांच्या नोंदी आणि केवायसी (KYC) गावनिहाय पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. कोणत्याही कारणाने शेतकरी लाभापासून वंचित राहता कामा नये आणि सर्व शेतकऱ्यांना विविध योजना लागू पडल्या पाहिजेत. 'ग्रीस्टॅक' नसलेल्या शेतकऱ्यांनाही मदत झाली पाहिजे आणि वर्ग २ मधील शेतकऱ्यांना ग्रीस्टॅकवर आणण्याचे काम करावे लागेल, असे सांगण्यात आले. तर मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या सूचनेनुसार कोकणातील शेतकऱ्यांना ग्रीस्टॅकची सक्ती केली करण्यात येऊ नये. डिजिटल क्रॉप सर्व्हे (डीसीएफ) मधील ऑनलाईन अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. याचसोबत एरंडोल आणि रावेर या भागात वाढलेल्या अवैध सावकारीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याचे नमूद करत दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नवीन योजनांचे नियोजन पुढील बैठकीत करण्याचे ठरले.

चारा टंचाईवर मात करण्यासाठी महसूल मंत्री बावनकुळे यांनी चारा छावण्यांऐवजी थेट ग्रामपंचायतींमार्फत डेपो उभारून चारा वाटप करावा, ज्यामुळे जनावरे मालकाच्या घरी राहतील आणि शेतकरी दूध घरी ठेवू

**शहरी व ग्रामीण भागात १० टक्के पाणीकपात लागू करण्यासोबतच, शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी त्रास देणाऱ्या बँकांवर कारवाई करणे, चाऱ्याची टंचाई दूर करणे आणि दिवाळीपूर्वी मदत वाटपाचे नियोजन करण्याबाबत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आले. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, राज्यात सध्या ४५ टक्क्यांवर पंचनामे पूर्ण झाले आहेत. उर्वरित पंचनाम्यांचे काम जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असून, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी पंचनाम्यासाठी ५ टक्के निधी वेगळा राखून ठेवण्याची सूचना मांडली. तसेच पीकविम्याचे काम अत्यंत व्यवस्थित आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडले जावे, यावर भर देण्यात आला.**





शकेल, असा प्रस्ताव मांडला. यावर ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी भ्रष्टाचाराच्या कारणास्तव छावण्या पूर्ण नाकारता येणार नाहीत, कारण छावणीत सर्व सुविधा असतात; त्यामुळे चारा डेपो आणि छावणी या दोन्ही बाबी तपासून निर्णय घ्यावा, असे मत व्यक्त केले. यावर वन विभागाच्या जमिनींवर, पडीक जमिनींवर तसेच जलसंपदाच्या तलावांलगतच्या शासकीय जमिनींवर 'ग्रासलँड डेव्हलपमेंट' करून मोठ्या चारा बँका तयार करण्याचा निर्णय झाला. विदर्भ आणि कोकणात भाताची पेंडी न जाळता ती साठवून त्यापासून जनावरांचे खाद्य तयार केले जाईल. पशुसंवर्धन विभागाचे सचिव रामास्वामी यांनी सांगितले की एनएलएम योजनेंतर्गत सायलेज बनवून बॅगांचे वाटप केले जाईल तसेच हायड्रोपोनिक्स व अझोला प्रकल्प सीएसआरच्या माध्यमातून राबवणे अपेक्षित असून, जेथे पाणी आहे तेथे रब्बीचे पीक घेतले जाऊ शकते. मंत्री नितेश राणे यांनी मत्स्यबीज वाटप करणे, जंगलातील तलावांमधील लँड बँकेचा वापर चारा निर्मितीसाठी करणे आणि गाळपेर जमिनीमध्ये सर्वांना लागवडीची संधी देणे या बाबी मांडल्या.

# वीजवाहिनी दुरुस्त करताना विद्युत धक्का झिरो वायरमनचा मृत्यू

## भिलदरी शिवारातील दुर्दैवी घटना पिशोर पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद

**पिशोर । जावेद शेख**

पिशोर येथील महावितरणच्या ३३ केव्ही उपकेंद्रांतर्गत भिलदरी शिवारात वीजवाहिनीवरील तांत्रिक बिघाड दुरुस्त करण्याचे काम सुरू असताना विद्युत धक्का लागून 'झिरो वायरमन' म्हणून कार्यरत असलेल्या विलास कडुबा मोकासे (वय ५०, रा. पिशोर, ता. कन्नड) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी (दि. ६) सायंकाळी घडली. या घटनेमुळे पिशोर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



भिलदरी शिवारातील वीजवाहिनीमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने तो दुरुस्त करण्याचे काम सुरू होते. या कामासाठी विलास मोकासे घटनास्थळी गेले होते. दुरुस्तीचे काम सुरू असताना त्यांना अचानक विद्युत प्रवाहाचा धक्का बसला. त्यानंतर त्यांना तातडीने पिशोर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. पटेल यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

या घटनेची माहिती ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पिशोर पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी आकस्मिक मृत्यू क्रमांक ६३/२०२६, कलम १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अन्वये नोंद केली. वैद्यकीय नोंदीनुसार विद्युत धक्का लागल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, विलास मोकासे यांच्यावर बुधवारी (दि. ७) दुपारी १२.३० वाजता पिशोर येथील शफेपूर श्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार दत्तू लोखंडे पुढील तपास करीत आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे मोकासे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरातून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

# आपसी वादातून एकाची हत्या

## आपटी रोडवरील हनुमान मंदिराजवळ लोखंडी पाइपने हल्ला; दोघे संशयित आरोपी अटकेत

**पुलगाव । प्रतिनिधी**

आपसी वादातून झालेल्या हल्ल्यात आपटी येथील ५० वर्षीय नागसेन मारोतराव भगत यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पुलगाव-आपटी मार्गावरील हनुमान मंदिराजवळील पुलावर बुधवारी (७ ऑक्टोबर) सकाळी साडेआठ ते नऊ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी दोघा संशयित आरोपींना अटक केली आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, नागसेन भगत हे सकाळच्या सुमारास आपटी रोडवरील हनुमान मंदिराजवळील पुलावर असताना गिरीश पद्माकर कोल्हे (वय ४८) आणि अविनाश जानर्दन कोल्हे (वय ४३, दोघेही रा. आपटी) यांनी त्यांच्यावर लोखंडी पाइपने हल्ला केला. अचानक झालेल्या या हल्ल्यात भगत गंभीर जखमी झाले.

घटनेनंतर जखमी नागसेन भगत यांना तातडीने पुलगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी सावंगी येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला.



दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पुलगाव पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी कारवाई करत गिरीश कोल्हे आणि अविनाश कोल्हे या दोघांना अटक केली. या घटनेमागील नेमके कारण तसेच हल्ल्याची पार्श्वभूमी याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मदनकर यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद राघाटाटे, संदीप बोरबन, सोमित गनथाडे, अजय अनंतवार आणि अमोल बरडे यांनी कारवाई केली. पुढील तपास पुलगाव पोलीस करीत आहेत.या घटनेमुळे आपटी परिसरात खळबळ उडाली असून, आपसी वादातून झालेल्या या हल्ल्याचे नेमके कारण तपासातून स्पष्ट होणार आहे.

# मुलच्या कृषी महाविद्यालयासाठी आ.सुधीर मुनगंटीवार यांचा पाठपुरावा ठरला निर्णायक; तात्काळ होणार पदभरती

## मूल कृषी महाविद्यालयाच्या प्रलंबित विकास प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याचे कृषिमंत्र्यांचे निर्देश;कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण, वनजमिनीचा प्रश्न, आकृतिबंध व एकार्जुना भाजीपाला संशोधन केंद्राच्या निधीवरही सकारात्मक चर्चा

**मूल । प्रतिनिधी**

येथील कृषी महाविद्यालयाच्या विकासासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला आता ठोस प्रशासकीय प्रतिसाद मिळाला असून, महाविद्यालयातील रिक्त पदांची याच महिन्यात पदभरती करण्याचे निर्देश कृषिमंत्री मा. दत्तात्रय भरणे यांनी संबंधित विभागाला दिले आहेत. महाविद्यालयातील मनुष्यबळाची कमतरता, प्रलंबित विकासकामे आणि शैक्षणिक-संशोधनाशी निगडित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही व्हावी, यासाठी आ. मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून मंत्रालयात कृषिमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत पदभरतीसह महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध प्रश्नांवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा झाली.या बैठकीस कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी मूल्य आयोगाचे सदस्य बंडू गौरकर तसेच कृषी विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मूलच्या कृषी महाविद्यालयातील आवश्यक पदे दीर्घकाळ रिक्त असल्यामुळे शैक्षणिक अध्यापन, प्रशासकीय कामकाज आणि संशोधनाच्या प्रक्रियेवर निर्माण होणाऱ्या अडचणींचा मुद्दा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बैठकीत ठामपणे मांडला. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे आणि महाविद्यालयाची संशोधनात्मक क्षमता अधिक बळकट व्हावी, यासाठी मनुष्यबळाची उपलब्धता अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाविद्यालयाची पदभरती याच महिन्यात करण्याची स्पष्ट मागणी आ.मुनगंटीवार यांनी केली. त्याची दखल घेत कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांनी विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.याचवेळी दीर्घकाळ सेवा बजावणाऱ्या कंत्राटी अधिकारी-कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न, महाविद्यालयाशी संबंधित वनजमिनीचा प्रलंबित प्रश्न आणि कृषी विद्यापीठाचा आकृतिबंध लागू करण्याचा मुद्दाही आ. मुनगंटीवार यांनी मांडला. या प्रश्नांवरही सकारात्मक मार्ग काढण्यासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही



करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. त्यामुळे पदभरतीपुरता विषय मर्यादित न राहता महाविद्यालयाच्या संस्थात्मक बळकटीकरणाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे मुद्दे बैठकीत ऐरणीवर आले. त्या सर्व मुद्द्यावर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबंधितांना निर्देश दिले.

एकार्जुना येथील भाजीपाला संशोधन केंद्रासाठी प्रलंबित असलेला निधी उपलब्ध करून देण्याचा मुद्दाही आ. मुनगंटीवार यांनी प्राधान्याने उपस्थित केला. भाजीपाला उत्पादनातील संशोधन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि त्याचा थेट लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे संशोधन केंद्र अधिक सक्षम करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

कृषी प्रदर्शनांमध्ये सेंद्रिय शेती आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानावर आधारित प्रभावी डजझ (डींरपवरीव जशीीरींळपस झीलशवीीश) तयार करण्याची मागणीही आ. मुनगंटीवार यांनी केली. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळणे ही कृषी विकासाची तितकीच महत्त्वाची बाजू असल्याचे स्पष्ट करत, जे विकतो ते पिकवले पाहिजे या संकल्पनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना केवळ उत्पादनाच्या टप्प्यावर नव्हे, तर उत्पादनापासून बाजारपेठेपर्यंत सक्षम करण्याची भूमिका आ.मुनगंटीवार यांनी बैठकीत मांडली. कृषी शिक्षण, संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांची सांगड घालून शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी प्रभावी व्यवस्था उभी करण्यावर त्यांनी भर दिला.मूलचे कृषी महाविद्यालय हे केवळ विद्यार्थ्यांना पदवी देणारी संस्था न राहता दर्जेदार कृषी शिक्षण, अत्याधुनिक संशोधन, नवतंत्रज्ञान आणि शेतकऱ्यांना प्रत्यक्ष उपयोगी ठरणाऱ्या ज्ञानाचे प्रभावी केंद्र बनावे, हा आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांचा केंद्रबिंदू आहे. महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधांसोबतच त्याला आवश्यक मनुष्यबळ, संशोधनाची साधने आणि संस्थात्मक क्षमता मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मूलच्या कृषी महाविद्यालयाला अपेक्षित उंची मिळेपर्यंत त्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरूच राहील, अशी भूमिका आ. मुनगंटीवार यांनी यावेळी स्पष्ट केली.

# सेवा संकल्प अभियानात वरोऱ्यात भाजपची बाईक रॅली

## आनंदवन चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकदरम्यान उत्साहात रॅली; एलईडी स्क्रीनवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संबोधनाचे प्रक्षेपण; रांगोळी स्पर्धेतही महिलांचा सहभाग; आमदार करण देवतळे यांच्या मार्गदर्शनात विविध उपक्रम

**वरोरा । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिवसानिमित्त सुरू करण्यात आलेल्या सेवा संकल्प अभियान अंतर्गत वरोरा शहरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अभियानाच्या निमित्ताने ८ ऑक्टोबर रोजी सकाळी आनंदवन चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकदरम्यान बाईक रॅली काढण्यात आली. रॅलीनंतर एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संबोधनाचे प्रक्षेपण करण्यात आले. त्याचबरोबर आमदार करण देवतळे यांच्या कार्यालयात रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सकाळी ९.३० वाजता आनंदवन चौकातून बाईक रॅलीला सुरुवात झाली. भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले होते. शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पोहोचली. यावेळी परिसरात भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

रॅलीनंतर एलईडी स्क्रीनवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संबोधनाचे प्रक्षेपण करण्यात आले. उपस्थित कार्यकर्त्यांनी हे संबोधन पाहिले. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्याचा संदेश देण्यात आला.

अभियानांतर्गत आमदार करण देवतळे यांच्या कार्यालयात रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विविध विषयांवर आकर्षक रांगोळ्या साकारत



सहभागी महिलांनी आपली कलात्मकता व सामाजिक संदेश प्रभावीपणे मांडला. स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आमदार करण देवतळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाला भाजपा ज्येष्ठ नेते डॉ. भगवानराव गायकवाड, गजानन राऊत, भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक संतोष पवार, भाजपा तालुकाध्यक्ष राजेंद्र सवई, युवा मोर्चा शहराध्यक्ष अनिकेत नाकाडे, भाजपा गटनेते अक्षय भिवदरे, संजय दानव, संजय गयनेवार, जगदीश तोटावार, दिलीप घोरपडे, नगरसेवक प्रवीण चिमुरकर, रवींद्र चहारे, अजिंक्य नरडे, अमित चवले, पंकज जाधव, प्रशांत उलमाले, बुधराज केवट, राहुल नरांजे, सूरज लोणारे, प्रकाश झाडे, दिवाकर नन्नावरे, हर्षद बोडणे, रुपेश चौधरी, विनायक बोढे, अनिल चिकाटे, शंकर कुराडकर यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून विविध सामाजिक व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत असून, वरोरा शहरातही पुढील काळात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# वेतनवाढीचा प्रस्ताव २० महिने शासनाच्या दारात!

## सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे निवासी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; आंदोलनाचा इशारा



**वर्धा । प्रतिनिधी**

दुय्यम न्यायालयांतील न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव तब्बल २० महिन्यांपासून शासनदरबारी प्रलंबित असल्याने सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. प्रलंबित प्रस्तावाला तातडीने मंजुरी देऊन न्यायालयीन कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या मागणीसाठी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वतीने निवासी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या विशेष समितीने समान कामाला समान वेतनाच्या धर्तीवर दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव तयार करून राज्य शासनाकडे सादर केला आहे. मात्र, प्रस्ताव सादर होऊन २० महिने उलटूनही त्यावर निर्णय झालेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न तातडीने मार्गी लावून शासनाने सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, अशी मागणी करण्यात आली. याप्रश्नी शासनाने दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्यानुसार १७ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असून, ५ नोव्हेंबर रोजी अन्नत्याग करून साखळी उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.निवेदन देतेवेळी सेवानिवृत्त न्यायालयीन संघटनेचे अध्यक्ष विजय ठाकरे, विनोद कडू, अब्दुल खतीब, अविनाश भोळे, सुनील देशमुख, अरविंद वितोंडे, संजय देवगीरकर, देविदास चवरे यांच्यासह सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते. तसेच वर्ग तीनचे अध्यक्ष सतीश तांबूस्कर व सचिव संदीप मूळे यांचीही उपस्थिती होती.

# करमाळ्यात महावितरणचे स्वतंत्र विभागीय कार्यालय तात्काळ सुरू करा

## मनसेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; मागणी मान्य न झाल्यास जनआंदोलनाचा इशारा

**करमाळा । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्याचे विस्तीर्ण भौगोलिक क्षेत्रफळ आणि बार्शी येथील महावितरणच्या विभागीय कार्यालयाचे तालुक्यातील शेवटच्या गावांपासून असलेले १४० ते १५० किलोमीटरचे अंतर लक्षात घेता करमाळा येथे महावितरणचे स्वतंत्र विभागीय कार्यालय तात्काळ सुरू करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.





मनसेचे करमाळा तालुका अध्यक्ष संजय (बापू) घोलप यांनी हे निवेदन दिले. दिलीप (बापू) धोत्रे, किशोर शिंदे, सुधीर पाटसकर, प्रशांत इंगळे आणि जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. मागणीची तातडीने दखल घेऊन कार्यवाही न झाल्यास जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा घोलप यांनी दिला.

सध्या करमाळा तालुका बार्शी येथील महावितरणच्या विभागीय कार्यालयाशी जोडलेला आहे. केतूर, कोंढार चिंचोली यांसह तालुक्याच्या टोकावरील गावांमधील शेतकरी, व्यावसायिक आणि वीज ग्राहकांना तक्रारी, वीजबिल दुरुस्ती, अर्ज तसेच अन्य प्रशासकीय कामांसाठी बार्शी येथे जावे लागते. त्यामुळे वेळ आणि पैशांचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जळालेले रोहित्र बदलणे, नवीन वीजजोडणीची प्रक्रिया तसेच वादळ-पावसाच्या काळातील आपत्कालीन मदतीमध्येही विलंब होत असल्याचा दावा मनसेने केला आहे. करमाळ्यात स्वतंत्र विभागीय कार्यालय सुरू झाल्यास नागरिकांच्या समस्या स्थानिक पातळीवरच मार्गी लागून प्रशासकीय कामांना गती मिळेल, असे निवेदनात म्हटले आहे.

या मागणीची तातडीने दखल घेऊन महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली आहे.

# चंद्रपूर एसटी आगारात शिवसेना राष्ट्रीय कर्मचारी सेनेची कार्यकारिणी गठीत

## सन २०२६-२७ साठी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड; आगार व्यवस्थापनाकडे यादी सादर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य परिवहन मंडळाच्या चंद्रपूर आगारात शिवसेना (शिंदे) गटाच्या राष्ट्रीय कर्मचारी सेनेची सन २०२६-२७ या वर्षासाठी नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली. जिल्हाप्रमुख ॲड. युवराज धानोरकर आणि राष्ट्रीय कर्मचारी सेनेचे विभागीय अध्यक्ष डॉ. प्रकाश रामटेके यांच्या उपस्थितीत कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यानंतर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची यादी आगार प्रशासनाकडे सादर करण्यात आली.



नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी सतीश आकनुरवार, उपाध्यक्षपदी पवन जाधव, सचिवपदी राहुल करपे, कार्याध्यक्षपदी सांबाशिव कायता, सहसचिवपदी गुलशन कारवटकर तर कोषाध्यक्षपदी रमाकांत धकाते यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून नितेश राऊत, दुर्गेश गरमळे, आतिष टेकाम, कौशिक शिल, संदीप कुमरे आणि प्रशांत टोंगे यांची निवड करण्यात आली.

जिल्हाप्रमुख ॲड. युवराज धानोरकर यांच्या नेतृत्वाखाली नवनियुक्त कार्यकारिणीची यादी प्रभारी आगार व्यवस्थापक हेमंतकुमार गोवर्धन आणि सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक मनोज डोंगरकर यांच्याकडे सादर करण्यात आली. यावेळी धानोरकर यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत कर्मचारी हितासाठी संघटितपणे काम करण्याचे आवाहन केले. तसेच नवीन कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी राष्ट्रीय कर्मचारी सेनेचे सचिव प्रशांत टोंगे, विभागीय कार्याध्यक्ष पराग झिझिलवार, विधानसभा प्रमुख अविनाश उके, शिवसेना बांधकाम कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष अभिजीत स्वान आणि विभागप्रमुख अदनान शेख उपस्थित होते.

# नुटाच्या बिनविरोध निवडीतून संघटनात्मक शिस्तीचा संदेश



**पब्लिक टॅग**

डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२

## निवडणूक न होण्यातही असते लोकशाहीची एक परिपक्व बाजू

> गावाच्या जुन्या वाचनालयात एक लहानसा दिवा संध्याकाळी लावला जायचा. त्या एका दिव्याभोवती कुणी वर्तमानपत्र वाचायचे, कुणी पुस्तकाची पाने उलटायचे, तर कुणी शांतपणे बसून दुसऱ्याचे वाचन ऐकायचे. प्रत्येकाची आवड वेगळी, विचार वेगळे; पण प्रकाश एकच. दिव्याने कधी कोणाला विचारले नाही की तू कोणते पुस्तक वाचतोस. त्याचे काम एकच सगळ्यांना दिसेल एवढा उजेड देणे. कदाचित संघटनेचेही खरे सामर्थ्य असेच असते. मते अनेक असली तरी सामूहिक ध्येयाचा प्रकाश एक असतो.



आजच्या सार्वजनिक जीवनात 'निवडणूक' हा शब्द उच्चारला की अटीतटीची स्पर्धा, गटबाजी, आरोप प्रत्यारोप आणि अंतर्गत कलह यांचे चित्र सहज डोळ्यांसमोर उभे राहते. निवडणूक ही नेतृत्व निवडण्याची लोकशाही प्रक्रिया असण्याऐवजी अनेकदा वर्चस्वाची लढाई बनते. निकाल जाहीर होतो, विजयी आणि पराभूत ठरतात; पण मनातील अंतर मात्र कायम राहते. अशा वातावरणात नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन अर्थात नुटाची संपूर्ण निवडणूक बिनविरोध पार पडणे ही केवळ एक प्रशासकीय घटना नाही. तिच्यामागे असलेल्या संघटनात्मक संस्कृतीकडे पाहण्याची ती संधी आहे.अध्यक्षपदी प्रा. डॉ. प्रवीण रघुवंशी, उपाध्यक्षपदी डॉ. प्रवीण जोगी, डॉ.अजित जाचक, सचिवपदी प्रा. नितीन कोंगरे आणि कोषाध्यक्षपदी प्रा. सौरभ घोगरे यांच्यासह उपाध्यक्ष, सहसचिव आणि कार्यकारी समितीच्या सर्व पदांवर उमेदवार बिनविरोध निवडले गेले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ क्षेत्रांना नेतृत्वाच्या विविध जबाबदाऱ्यांमध्ये प्रतिनिधित्व मिळाले आहे. त्यामुळे या निवडीकडे केवळ व्यक्तींच्या पदप्राप्तीच्या चौकटीत न पाहता विविध घटकांना एका सामूहिक धाग्यात बांधण्याची प्रक्रिया म्हणून पाहता येते.बिनविरोध निवड झाली म्हणजे संघटनेत मतभेदच नाहीत, असा अर्थ काढणे चुकीचे ठरेल. विचार जिवंत असतील तिथे मतभेद असणारच. उलट प्रश्न विचारणारी आणि वेगवेगळ्या मतांना जागा देणारी संघटनाच सुदृढ असते. खरी शिस्त मतभेद दडपण्यात नसते; त्यांना वैमनस्य होऊ न देण्यात असते. आपले मत ठामपणे मांडतानाच दुसऱ्याचे म्हणणे ऐकणे, व्यक्तीऐवजी मुद्द्यावर चर्चा करणे आणि अंतिम निर्णयानंतर सामूहिकपणे पुढे जाणे, ही संघटनात्मक परिपक्वतेची खूण आहे. आज अनेक ठिकाणी मताचा विरोध हळूहळू व्यक्तीच्या विरोधात बदलतो. एखाद्या निर्णयावर प्रश्न उपस्थित झाला की प्रश्न विचारणारा 'आपला की परका' या मोजपट्टीवर तपासला जातो. तिथून गट निर्माण होतात आणि गटांमधून संशय वाढतो. संवादाची दारे हळूहळू बंद होतात. बाहेरून संस्था भक्कम दिसत असली तरी आतून तिची वीण सैल होऊ लागते. वैचारिक संघटनेची खरी ओळख याच्या उलट असते. ती व्यक्तीवर नव्हे, विचारावर चर्चा करते. प्रश्नाला शत्रू मानत नाही; प्रश्नातून पुढचा मार्ग शोधते.नुटा ही प्राध्यापकांची संघटना आहे. त्यामुळे तिच्यासमोरचे प्रश्नही व्यापक आहेत. उच्च शिक्षण क्षेत्रातील सेवा संबंधित बाबी, शैक्षणिक स्वायत्तता, संशोधनाचे वातावरण, पदोन्नती, प्रशासकीय निर्णय आणि शिक्षकांचे हक्क यासाठी केवळ घोषणांची उष्णता पुरेशी नसते. त्यासाठी अभ्यास, तथ्य, सातत्य आणि संघटित पाठपुरावा लागतो. अंतर्गत गटबाजीत खर्च होणारी ऊर्जा जर या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी वळवली, तर संघटनेचा आवाज अधिक प्रभावी होऊ शकतो. याच ठिकाणी नुटाच्या बिनविरोध निवडीचा एक नवा अर्थ समोर येतो. बिनविरोध निवड म्हणजे संघर्षाचा अभाव नव्हे; संघर्षाला विधायक दिशा देण्याची क्षमता असू शकते. लोकशाहीत स्पर्धेला स्थान आहेच. परंतु जिथे संवादातून सर्वमान्य पर्याय निर्माण होऊ शकतो, तिथे केवळ स्पर्धेसाठी संघर्ष उभा करण्याची आवश्यकता नसते. मतपेटी ही लोकशाहीची एक अभिव्यक्ती आहे; परस्पर विश्वास आणि संवाद हे तिचे अधिक खोल अधिष्ठान आहे. या निवडीमुळे नेतृत्वाची जबाबदारी कमी झालेली नाही; उलट ती वाढली आहे. निवडणुकीत विजय मिळवणे ही एक घटना असते; विश्वास टिकवणे हा दीर्घ प्रवास असतो. बिनविरोध निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी आता सर्व सदस्यांना समानतेने आणि सन्मानाने सोबत घेणे, निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता राखणे आणि विविध विद्यापीठ क्षेत्रांच्या प्रश्नांना न्याय देणे आवश्यक आहे. सर्वानुमते मिळालेला विश्वास हा पदाचा अलंकार नसतो; तो कामाची उधारी असतो. या निवडीतून नेतृत्वाची आणखी एक व्याख्या समोर येते. खरे नेतृत्व म्हणजे केवळ आपल्या समर्थकांना सोबत घेणे नव्हे. ज्यांचे मत वेगळे आहे, ज्यांनी प्रश्न विचारले आहेत किंवा ज्यांनी आपल्याला समर्थन दिले नाही, त्यांच्यासाठीही समान दार उघडे ठेवणे म्हणजे नेतृत्व. संघटना एका व्यक्तीभोवती फिरू लागली की तिची उंची कमी होते; विचाराभोवती उभी राहिली की तिची वाट अधिक दूर जाते. आज समाजाच्या अनेक स्तरांवर मतभेदांचे ध्रुवीकरण होत आहे. 'माझे मत' आणि 'माझी व्यक्ती' यांच्यातील फरक आपण विसरत चाललो आहोत. त्यामुळे वेगळे बोलणारा लगेच विरोधक वाटू लागतो. अशा काळात वैचारिक संघटनेने वेगळा आदर्श ठेवणे आवश्यक आहे. मतभिन्नता स्वीकारायची, पण ध्येयभिन्नता निर्माण होऊ द्यायची नाही. विचारांच्या अनेक वाटा असल्या तरी संघटनेचा रस्ता एकत्र राहू शकतो. मात्र बिनविरोध निवड ही स्वतःमध्ये अंतिम यश नाही. तिचे खरे मूल्य पुढील कामातून ठरणार आहे. शिक्षकांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका, प्रशासनाशी परिणामकारक संवाद, सदस्यांशी सातत्यपूर्ण संपर्क आणि सर्व घटकांना विश्वासात घेणारी कार्यपद्धती यामुळेच या निवडीला अर्थ प्राप्त होईल. आज मिळालेला एकोपा उद्याच्या कामात दिसला नाही, तर बिनविरोध निवड केवळ एक सुंदर प्रसंग ठरेल. पण त्या एकोप्याने कामाला दिशा दिली, तर तो संघटनेच्या इतिहासातील महत्त्वाचा वळणबिंदू ठरू शकतो. बिनविरोध निवडीचा आणखी एक सुंदर पैलू आहे. निवडणुकीत 'जिंकलेले' आणि 'हरलेले' असे दोन तट निर्माण झाले नाहीत. त्यामुळे संघटनेसमोर आता एक वेगळी संधी आहे सर्वांनी मिळून विजयाची व्याख्याच बदलण्याची. एखाद्या व्यक्तीचा विजय नव्हे, तर संघटनेच्या उद्दिष्टांचा विजय. पदाचा विजय नव्हे, तर प्रश्नांच्या सोडवणुकीचा विजय. ही दिशा कायम राहिली तर बिनविरोध निवड ही केवळ निवडणूक प्रक्रियेतील घटना न राहता संघटनेच्या कार्यसंस्कृतीचा भाग बनेल. शेवटी त्या जुन्या वाचनालयातील दिव्याची आठवण होते. दिवा एकच होता; पण त्याच्याभोवती बसलेल्या माणसांची पुस्तके वेगवेगळी होती. कुणाला इतिहास आवडत होता, कुणाला साहित्य, कुणाला वर्तमानपत्रातील घडामोडी. तरी प्रकाश सर्वांसाठी समान होता. संघटनेचेही तसेच आहे. प्रत्येकाचा विचार वेगळा असू शकतो; पण सामूहिक ध्येयाचा प्रकाश कमी होता कामा नये. नुटाच्या बिनविरोध निवडीने त्या प्रकाशाची एक झलक दाखवली आहे. आता त्याला कामाची ज्योत मिळणे आवश्यक आहे. कारण संघटनेची खरी ताकद किती मते एकसारखी आहेत यात नसते; वेगवेगळी मने एका समान उद्देशासाठी किती प्रामाणिकपणे एकत्र उजेड निर्माण करतात, यात असते. या निमित्ताने नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी आणि त्यांच्या टीमला शुभेच्छा.

# तलाठी, ग्रामसेवकांपाठोपाठ शिक्षकही मुख्यालये सोडून परगावी

## गावाचा विकास वाऱ्यावर सोडून 'पगारी' कर्मचारी तालुक्याला स्थायिक; ग्रामस्थांचा संताप



शासकीय नियमांनुसार सर्व तलाठ्यांनी आपल्या नियुक्त गावाच्या मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. मुख्यालयी न राहता परगावून ये-जा करणाऱ्या तलाठ्यांमुळे नागरिकांची कामे रेंगाळत असतील, तर ते खपवून घेतले जाणार नाही. आम्ही लवकरच तालुक्यातील सर्व साजांची (तलाठी कार्यालयांची) अचानक पाहणी करणार आहोत. जे तलाठी मुख्यालयी गैरहजर आढळतील, त्यांच्यावर प्रशासकीय शिस्तभंगाची कडक कारवाई करण्यात येईल.

–शुभम बहाकर तहसीलदार (गोंडपिपरी)



ग्रामसेवक आणि शिक्षक हे ग्रामीण विकासाचे व शिक्षणाचे मुख्य आधारस्तंभ आहेत. त्यांनी मुख्यालय सोडून राहिल्याने गावातील विकासकामे रखडत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सर्व ग्रामसेवक आणि शिक्षकांना मुख्यालयी राहण्याचे सक्त आदेश यापूर्वीच दिलेले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांचा घरभाडे भत्ता रोखण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध वरीष्ठांकडे कडक कारवाईचा अहवाल पाठवला जाईल.

–संजय नैताम,गटविकास अधिकारी – (पंचायत समिती,गोंडपिपरी)

**गोंडपिपरी । नागेश इटेकर**

ग्रामीण भागाचा मुख्य कणा मानले जाणारे तलाठी, ग्रामसेवक आणि थेट विद्यार्जनाचे धडे देणारे शिक्षक हे सरकारी नियमांना थेट हरताळ फासून मुख्यालयी राहण्याऐवजी परगावी किंवा तालुक्याच्या ठिकाणी स्थायिक झाले असल्याचे विदारक चित्र सध्या गोंडपिपरी तालुक्यात पाहायला मिळत आहे. आपल्या कर्तव्याला आणि गावाला वाऱ्यावर सोडून हे सर्व 'पगारी' लोक परगावी राहत असल्याने, तालुक्यातील अनेक गावांमध्ये सध्या 'धनी ना कोणी' अशी गंभीर अवस्था निर्माण झाली आहे.वास्तविक पाहता, गावातील ग्राम प्रशासन व्यवस्थित चालवून आरोग्य, पाणी, रस्ते, शिक्षण, वीज आणि स्वच्छता यासारख्या मूलभूत सोयी-सुविधा जनतेला उपलब्ध करून देणे ही ग्रामसेवकाची आद्य कर्तव्ये आहेत. तर दुसरीकडे, जमिनीच्या नोंदी ठेवणे, महसूल गोळा करणे, पिकांची पाहणी करणे आणि शेतकऱ्यांना विविध दाखले वेळेत देणे ही महसूल विभागातील महत्त्वाचा दुवा असलेल्या तलाठ्याची मुख्य जबाबदारी आहे. मात्र, हे दोन्ही महत्त्वाचे घटक गावातून गायब राहत असल्याने नागरिकांना साध्या कामांसाठीही चकरा माराव्या लागत आहेत.

या बेजबाबदार पद्धतीमुळे प्रशासकीय कामांना प्रचंड विलंब होत असून, गावातील विकासकामे रखडली आहेत आणि



ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. या सर्व प्रकारामुळे गोंडपिपरी तालुक्यातील नागरिक कमालीचे त्रस्त झाले असून, पदाचा आणि पगाराचा लाभ घेताना गावाची जबाबदारी झटकणाऱ्या अशा कामचुकार शासकीय कर्मचाऱ्यांवर शासनाने आणि वरिष्ठ प्रशासनाने तात्काळ कडक दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी आता तालुक्यात जोर धरू लागली आहे.

### शिक्षकांच्या परगावी राहण्याने 'विकास' शाळेत हरवला!

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे, दर्जेदार शिक्षण देणे आणि त्यांच्यात नैतिक मूल्ये रुजवणारे शिक्षक हेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे आधारस्तंभ असतात. मात्र, दुर्दैवाने आता हेच 'गुरुजी' आपल्या स्वत:च्या मुलांच्या चांगल्या शिक्षणासाठी तालुक्याच्या ठिकाणी वास्तव्यास गेले आहेत. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांचा हा मोठा आधारस्तंभ अलीकडे कुचकामी ठरत असून, गावातील एकूणच शैक्षणिक विकास आता शाळेतच हरवला असल्याचे चित्र आहे.

### घड्याळाची वेळ बांधून येतात आणि घोड्यावर जातात!

आपल्या मुख्य जबाबदारीपासून पुरते भरकटलेले तलाठी आणि ग्रामसेवक गावात कधी येतात आणि कधी निघून जातात, याचा कोणालाच थांगपत्ता लागत नाही. शिक्षक तर घड्याळाची वेळ बांधून शाळेत येतात आणि सुटी होताच घोड्यावर बसून निघून जातात, अशी संतप्त आणि जळजळीत प्रतिक्रिया एका त्रस्त ग्रामस्थाने दिली आहे.

# भारत विद्यालयात वीरांगना राणी दुर्गावती जयंती उत्साहात



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

भारत विद्यालय, उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालय व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम, हिंगणघाट येथे वीरांगना राणी दुर्गावती जयंती उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. सोमवार (५ ऑक्टोबर) रोजी आयोजित या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना राणी दुर्गावती यांच्या शौर्य, पराक्रम आणि स्वाभिमानाची प्रेरणा देण्यात आली.कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका मनीषा कोंडावार यांनी वीरांगना राणी दुर्गावती यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण केले. त्यानंतर विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक व कार्यक्रमाचे मार्गदर्शक डॉ. गजानन सयाम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. गजानन सयाम म्हणाले की, वीरांगना राणी दुर्गावती मडावी यांची शौर्यगाथा आणि इतिहास संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. राणी दुर्गावती या भारतीय इतिहासातील अद्वितीय, पराक्रमी आणि स्वाभिमानी शासिका होत्या. मातृभूमीच्या रक्षणासाठी त्यांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. त्यांच्या जीवनातून धैर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.कार्यक्रमाला सांस्कृतिक विभाग प्रमुख शुभांगी साळवे, हर्षा भूतडा, तसेच पराग लोंधे, पूनम राठी, प्रशांत वानखेडे, राजश्री तांबोळी आणि झाडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान राणी दुर्गावती यांच्या कार्याचा आणि शौर्याचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

# मंगेश चिवटेंच्या उमेदवारीसाठी राष्ट्रवादीही मैदानात

## रामराजे नाईक निंबाळकरांचा अपक्ष लढतीचा सल्ला; संजीवराजेंकडून 'माघार नाही'चा निर्धार

**फलटण । प्रतिनिधी**

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फलटण येथे शिवसेनेचे उमेदवार मंगेश चिवटे यांच्या प्रचारार्थ आयोजित विजय संकल्प सभा राजकीयदृष्ट्या चर्चेचा विषय ठरली. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा विधान परिषदेचे आमदार रामराजे नाईक निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सभेत चिवटे यांच्या उमेदवारीला स्थानिक पातळीवर राष्ट्रवादी कॉंग्रेसकडूनही पाठबळ असल्याचे स्पष्ट झाले.

यावेळी रामराजे नाईक निंबाळकर यांनी मंगेश चिवटे यांना निवडणुकीतून माघार न घेता लढत कायम ठेवण्याचा सल्ला दिला. महायुतीमध्ये राज्यपातळीवर दिलेला शब्द पाळला गेला नाही, तर अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची तयारी ठेवावी, असे त्यांनी स्पष्ट केले. फलटणचा डीएनएच अपक्ष लढण्याचा आहे. तुम्ही काळजी करू नका, असेही



त्यांनी सांगितले.

श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांनीही चिवटे यांच्या उमेदवारीला ठाम समर्थन दिले. एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत चिवटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून आता कोणत्याही परिस्थितीत माघार नाही, तर निवडूनच यायचे, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून चिवटे यांनी केलेल्या रुग्णसेवेचाही संजीवराजे यांनी उल्लेख केला. सामान्य नागरिकांच्या अडचणीच्या काळात मदतीला धावून जाणे हीच त्यांची खरी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, मंगेश चिवटे यांनीही मी लढणार आणि जिंकणारच; कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नाही, असा निर्धार व्यक्त केला. सभेला शिक्षक, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशनच्या निवडणुकीत सर्व उमेदवार अविरोध

## अध्यक्षपदी डॉ. प्रवीण रघुवंशी, उपाध्यक्षपदी प्रा.प्रवीण जोगी, प्रा.अजित जाचक



डॉ.प्रवीण रघुवंशी



डॉ.प्रवीण जोगी



डॉ.अजित जाचक



डॉ.नितीन कोंगरे



डॉ.निहार बोडेले

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स (नुटा) असोसिएशनच्या निवडणुकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष तसेच कार्यकारी समितीच्या सदस्यांची पाच वर्षांसाठी अविरोध निवड झाली आहे. अध्यक्षपदी डॉ. प्रवीण रघुवंशी यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी गोंडवाना विद्यापीठ क्षेत्रासाठी प्रा. प्रवीण एस. जोगी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ क्षेत्रासाठी प्रा. अजित रविकांत जाचक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ क्षेत्रासाठी प्रा. नितीन व्ही. चांगोले यांची अविरोध निवड झाली. सचिवपदी प्रा. नितीन सी. कोंगरे सहसचिवपदी रा.तु.म. नागपूर विद्यापीठ क्षेत्रासाठी प्रा. हेमंत व्ही. बागडे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ क्षेत्रासाठी प्रा. रवींद्र एन. मुंद्रे, गोंडवाना विद्यापीठ क्षेत्रासाठी प्रा. निहार ए. बोडेले यांची निवड झाली. कोषाध्यक्षपदी प्रा. सौरभ ए. घोगरे यांची अविरोध निवड झाली. कार्यकारी समिती सदस्य म्हणून प्रा. रुपेश आर. कुचेवार, प्रा. आशिष एस. राऊत, प्रा. त्रिथराज डी. रॉय, प्रा. के. जे. सिबी आणि प्रा. सुधीर सी. त्रिकांडे यांची निवड झाली. संघटनेच्या सर्व पदांवर झालेली ही अविरोध निवड म्हणजे प्राध्यापकांमध्ये संघटनात्मक एकोपा व सहकार्याची भावना असल्याचे द्योतक असल्याची भावना यावेळी प्रा .प्रवीण जोगी यांनी व्यक्त केली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे प्राध्यापक वर्गातून अभिनंदन होत असून, उच्च शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांसाठी संघटना अधिक प्रभावीपणे कार्य करेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या सूचनेनंतर रेल्वे आणि नगर परिषद प्रशासनाकडून संयुक्त पाहणी

## गोल पुलियामधून होणाऱ्या वाहतुकीची समस्या लवकरच सोडवली जाईल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागपूर-काझीपेठ तिसऱ्या आणि चौथ्या मार्गाच्या कामामुळे बल्लारपूर शहरातील बस्ती येथील 'गोल पुलिया'चा विस्तार करण्यात आला होता. मात्र, या बांधकामामुळे गेल्या दोन वर्षांपासून स्थानिक नागरिकांना व वाहनधारकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांची ही समस्या लक्षात घेऊन नगर परिषद प्रशासनाने स्थानिक खासदार प्रतिभा धानोरकर यांना परिस्थितीची माहिती देत प्रत्यक्ष भेटीची विनंती केली होती. त्यानुसार २८ सप्टेंबर रोजी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी गोल पुलिया परिसराला भेट देऊन पाहणी केली आणि मध्य रेल्वेच्या नागपूर विभागीय व्यवस्थापकांशी संपर्क साधून हा प्रश्न तात्काळ सोडवण्याचे निर्देश दिले. खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या सूचनेची तातडीने दखल घेत मंगळवारी दुपारी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे एक विशेष पथक आणि स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी गोल पुलिया परिसरात संयुक्त पाहणी केली.



या पाहणी दरम्यान रेल्वेचे कार्यकारी अभियंता दिलीप सेलूकर, उपनगराध्यक्ष देवेंद्र आर्य, बांधकाम सभापती अब्दुल करीम शेख, पाणीपुरवठा सभापती इस्माईल ढकवाला, ज्येष्ठ नगरसेवक भास्कर माकोडे, बांधकाम विभागाचे मयूर दहीकर, कृष्णा गुलहाने, प्रणय वाटेकर, कंत्राटदाराचे प्रतिनिधी संदीप चौहान आणि खासदार प्रतिनिधी शेगावकर यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते. पाहणीदरम्यान रेल्वे व नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला आणि स्थानिक नागरिकांशी थेट संवाद साधला. तसेच या समस्येवर तांत्रिक व प्रशासकीय बाबी तपासून कामाला सुरवात केली. खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे व दिलेल्या निर्देशांमुळे रेल्वे प्रशासन आणि नगर परिषदेने तात्काळ सकारात्मक पावले उचलल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. खासदार महोदयांच्या पुढाकारामुळे गोल पुलिया परिसरातील वाहतुकीची आणि रस्त्याची अडचण लवकरच दूर होणार असल्याचे संकेत मिळाल्याने बल्लारपूरवासीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# सामाजिक निर्देशांक उंचावून नागरिकांचे जीवनमान सुधारा–मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे

**गडचिरोली । प्रतिनिधी**

'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांनी आरोग्य, पोषण व शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले.शासकीय योजनांचा लाभ प्रत्यक्ष मिळतो का, याची क्षेत्रीय भेटीद्वारे पडताळणी करून नियमित पाठपुरावा करावा. गरोदर मातांची वेळेत नोंदणी, प्रसूतीपूर्व तपासणी, किशोरवयीन मुलींची हिमोग्लोबिन तपासणी, कुपोषित बालकांचा नियमित आढावा तसेच पोषण पुनर्वसन केंद्रांचा प्रभावी वापर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. मलेरिया, क्षयरोग, कुष्ठरोग,



सिकलसेल तसेच असंसर्गजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यावर भर देण्यात आला. तंबाखू सेवन करणाऱ्यांची मुखाच्या कर्करोगासाठी, तसेच महिलांची स्तन व गर्भाशयमुखाच्या कर्करोगासाठी प्राथमिक तपासणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. आरोग्य, शिक्षण, ग्रामपंचायत आणि महिला व बालकल्याण विभागांनी समन्वयातून अभियान राबवावे. प्रत्येक तालुक्यातील किमान पाच गावे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी पात्र ठरतील, अशा पद्धतीने नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यशाळेत आरोग्यविषयक विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. तालुकास्तरीय प्रतिनिधींनी नावीन्यपूर्ण उपक्रम व पुढील नियोजनाचे सादरीकरण केले. पथनाट्य व पोवाड्याद्वारेही आरोग्य जनजागृती करण्यात आली.

# बीडच्या पाणीटंचाईवरून प्रशासनाला सवाल

## बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये यांचा आरोप; तातडीने पाणी नियोजनाची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये यांनी नगरपालिका प्रशासन आणि शासनाच्या पाणीपुरवठा नियोजनावर प्रश्न उपस्थित केले आहेत. गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून सत्तेत असलेल्या लोकप्रतिनिधींना शहराच्या पाणीप्रश्नाचे गांभीर्य आताच का जाणवले, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

अटल अमृत जल योजनेचे काम अपूर्ण का राहिले, त्याची सद्यस्थिती काय आहे आणि योजनेतून शहराला अपेक्षित पाणीपुरवठा का होऊ शकला नाही, याबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी जायभाये यांनी केली. शहरातील अनेक भागांमध्ये महिनाभरापासून पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याचा दावा त्यांनी केला असून, आगामी काळात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची



शक्यता व्यक्त केली.

नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या कारभारावरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. शहरातील अनधिकृत नळजोडण्यांची संख्या मोठी असल्याचा दावा करत, नोंदणीकृत आणि अनधिकृत जोडण्यांची अधिकृत आकडेवारी तातडीने जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच पाणीपुरवठ्यासाठी शासनाकडून उपलब्ध झालेल्या निधीतून कोणती कामे करण्यात आली, याची माहिती सार्वजनिक करण्याची मागणीही त्यांनी केली.बीड शहरासाठी तातडीने पाणीपुरवठ्याचे नियोजन, उपलब्ध जलस्रोतांचा योग्य वापर आणि पर्यायी उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे जायभाये यांनी सांगितले. योग्य नियोजन केल्यास आठ दिवसांत दोन वेळा पाणीपुरवठा करणे शक्य असल्याचा दावाही त्यांनी केला. आगामी पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागांनी समन्वयाने ठोस आराखडा तयार करावा, अशी मागणी त्यांनी केली.

# गोंडपिपरीतील 'आपला दवाखाना' गोरगरिबांसाठी ठरतोय नवसंजीवनी

## मोफत तपासणी, उपचारांसह ३० हून अधिक वैद्यकीय चाचण्यांची सुविधा; दुपारी १२ ते रात्री १० पर्यंत सेवा

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेअंतर्गत गोंडपिपरी येथे सुरू असलेला आपला दवाखाना सर्वसामान्य नागरिकांसाठी आधारवड ठरत आहे. मोफत तपासणी, उपचार आणि ३० हून अधिक प्रकारच्या वैद्यकीय चाचण्या एकाच छताखाली उपलब्ध होत असल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.

गोंडपिपरी शहरातील नागरिकांना घराजवळच प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या दवाखान्यात सध्या उपचारासाठी रुग्णांचा ओघ वाढला आहे. नवनियुक्त आरोग्य अधिकारी डॉ. सायली मुरमुरवार यांच्या मार्गदर्शनाखाली परिचारिका दुर्गे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्रुती दहेलकर, शरद कोरे तसेच मदतनीस शील उराडे आणि कविता आसंगारी रुग्णांची आस्थेने विचारपूस करून सेवा देत आहेत.

विशेष म्हणजे, दवाखाना दुपारी १२ ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू राहत असल्याने नोकरदार, मजूर तसेच दिवसभर कामावर असलेल्या नागरिकांना आपल्या सोयीच्या वेळेत उपचार घेणे शक्य होत आहे. मोफत औषधोपचार आणि वैद्यकीय तपासण्यांमुळे अनेक नागरिकांना खासगी रुग्णालयांवरील खर्चाचा भार टाळता येत आहे.दवाखान्याच्या कामकाजावर जिल्हा आरोग्य अधिकारी अशोक कटारे, एनआरएचएम अधिकारी पराग जिवतोडे, तालुका आरोग्य अधिकारी पराग जवळे आणि पर्यवेक्षक मुन्ना मेश्राम यांचे मार्गदर्शन व देखरेख आहे. योग्य नियोजनामुळे दवाखान्यात औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असून, उपलब्ध सुविधांचा नागरिकांना लाभ मिळत आहे.



### कर्मचाऱ्यांच्या नावांचा फलक लावण्याची मागणी

दरम्यान, दवाखान्यातील आरोग्य सेवा समाधानकारक असली तरी येथे कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे आणि पदे दर्शविणारा फलक मुख्य भागात अद्याप लावण्यात आलेला नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. रुग्णांना सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांची ओळख स्पष्ट व्हावी तसेच कारभारात अधिक पारदर्शकता राहावी, यासाठी प्रशासनाने कर्मचाऱ्यांची नावे व पदांसह माहिती फलक तातडीने लावावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# गुलाबी बोंडअळीसह कापसावरील किडींवर नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन

## भिमणी येथे क्रॉपसॅपअंतर्गत कापूस पीक व्यवस्थापनाचे चौथे प्रशिक्षण; ३० हून अधिक शेतकऱ्यांचा सहभाग

**पोंभुर्णा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या क्रॉपसॅप (उठजझ ड-झ) अर्थात पीक कीड व रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पांतर्गत कापूस पीक व्यवस्थापनाचे चौथे शेतकरी प्रशिक्षण सत्र ४ ऑक्टोबर रोजी मौजा भिमणी येथे पार पडले. प्रशिक्षणाला ३० हून अधिक शेतकरी तसेच तालुक्यातील पाणी फाउंडेशनच्या शेतकरी गटांनी सहभाग घेतला.सध्या कापूस पीक बोंड विकासाच्या महत्त्वपूर्ण अवस्थेत असल्याने गुलाबी बोंडअळी, मावा, तुडतुडे आणि पांढरी माशी यांसारख्या किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नियमित पीक पाहणी व योग्य वेळी उपाययोजना करण्याचे आवाहन करण्यात आले.सहाय्यक कृषी अधिकारी बी. डी. आत्राम यांनी कापूस पिकावरील विविध किडींची ओळख, प्रादुर्भावाची लक्षणे आणि एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. बोंड विकासाच्या अवस्थेत पाणी व्यवस्थापन, पिकाची निगा आणि फवारणीचे योग्य नियोजन याबाबतही त्यांनी माहिती दिली.प्रभारी तालुका कृषी अधिकारी गणेश गवळी यांनी कापसाच्या धसकट व्यवस्थापनानंतर रब्बी हंगामात हरभरा, मोहरी, जवस आणि ताग यांसारख्या पिकांचा फेरपालट किंवा आंतरपीक म्हणून वापर करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. कमी पाण्यात येणाऱ्या या पिकांमुळे जमिनीचा पोत व सुपीकता सुधारण्यास मदत होते, तसेच पुढील हंगामातील किडींचा प्रादुर्भाव कमी करण्यास हातभार लागतो, असे त्यांनी सांगितले.प्रशिक्षणादरम्यान निंबोळी अर्क, ट्रायकोग्रामा कार्ड आणि जैविक कीड नियंत्रणाच्या विविध पद्धतींचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्यात आले. अनावश्यक व अवेळी रासायनिक फवारणी टाळून कृषी विभागाच्या सल्ल्यानुसारच फवारणीचे नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले. क्रॉपसॅपअंतर्गत दर सोमवारी व गुरुवारी प्रसारित होणाऱ्या कीड-रोग सल्ला पत्रकाचा आधार घेण्याचा सल्लाही देण्यात आला.कार्यक्रमास सहाय्यक कृषी अधिकारी नितीन गाडेकर, राजेंद्र जुमनाके, प्रगतिशील शेतकरी सुभाष काळे, गिरसावळे तसेच पाणी फाउंडेशनचे शेतकरी गट व परिसरातील शेतकरी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहाय्यक कृषी अधिकारी तथा पाणी फाउंडेशन मेंटॉर नितीन गाडेकर यांनी केले.




# रायगडच्या कुमार कबड्डी संघात ओम पावशेची निवड

**रोहा । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कुमार गट निवड व अजिंक्यपद चाचणी कबड्डी स्पर्धेत जय बजरंग क्रीडा मंडळ, रोहा यांच्या कुमार गट संघाने दमदार कामगिरी करत पहिल्या आठ संघांमध्ये स्थान मिळविले. या स्पर्धेत संघाचा अष्टपैलू खेळाडू ओम रविंद्र पावशे याने आक्रमणासह बचावातही प्रभावी खेळ करत संघाच्या यशात महत्त्वपूर्ण योगदान दिले. ओम पावशे याने संपूर्ण स्पर्धेदरम्यान सातत्यपूर्ण आणि आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले. त्याच्या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीची दखल घेत निवड समितीने त्याची रायगड जिल्हा कुमार गट कबड्डी संघात निवड केली आहे. त्यामुळे आगामी पालघर येथे होणाऱ्या ५३व्या महाराष्ट्र राज्य निवड व अजिंक्यपद कुमार गट कबड्डी स्पर्धेत ओम पावशे रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. ओमच्या या निवडीमुळे जय बजरंग क्रीडा मंडळ, रोहा तसेच परिसरातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. त्याच्या निवडीबद्दल जय बजरंग क्रीडा मंडळाचे अध्यक्ष अमर सलागरे यांनी अभिनंदन केले. राज्यस्तरीय स्पर्धेतही ओमने



मेहनत, शिस्त आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर रायगड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

ओम पावशेच्या निवडीबद्दल जय बजरंग क्रीडा मंडळाच्या पदाधिकारी, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमींनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. .

# रब्बीच्या क्षेत्रवाढीसाठी कृषी विभागाची मोहीम

## घनोटी येथे १०० शेतकऱ्यांना मार्गदर्शन

## पोंभुर्णा तालुक्यात ६१६२ एकर क्षेत्रवाढीचे उद्दिष्ट



**पोंभुर्णा । प्रतिनिधी**

रब्बी हंगाम २०२६-२७ मध्ये क्षेत्रवाढ करण्याच्या उद्देशाने कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), चंद्रपूर आणि तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पोंभुर्णा यांच्या संयुक्त विद्यमाने घनोटी नं. २ येथे ६ ऑक्टोबर रोजी शेतकरी प्रशिक्षण घेण्यात आले. प्रशिक्षणाला सुमारे १०० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

अल निनोचा प्रभाव, खरीप हंगामातील पीक परिस्थिती आणि आगामी रब्बी हंगामातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता कमी पाण्यात चांगले उत्पादन देणाऱ्या पिकांच्या लागवडीवर प्रशिक्षणात भर देण्यात आला. हरभरा, मसूर, जवस आणि करडई या पिकांना प्राधान्य देण्याचे आवाहन कृषी विभागाने केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका कृषी अधिकारी गणेश गवळी होते. त्यांनी शासनाच्या विविध कृषी योजना, बियाणे अनुदान आणि पीक विम्याबाबत माहिती दिली. यंदा पोंभुर्णा तालुक्यात रब्बी क्षेत्रवाढीसाठी ६१६२ एकरांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सहाय्यक कृषी अधिकारी भावेश आत्राम यांनी हरभरा व मसूरच्या सुधारित वाणांसह बीजप्रक्रिया आणि बीबीएफ पद्धतीने पेरणीचे महत्त्व स्पष्ट केले. सहाय्यक कृषी अधिकारी राजेंद्र जुमनाके यांनी जवस व करडईचे कमी पाण्यातील व्यवस्थापन, रानडुकरांपासून संरक्षण आणि बाजारभावाबाबत मार्गदर्शन केले.नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे समूह सहाय्यक तुषार वाघ यांनी रब्बी ज्वारी, करडई व तागाचा हिरवळीचे खत म्हणून वापर, आच्छादन आणि जमिनीची सुपीकता वाढविण्याच्या उपाययोजनांची माहिती दिली.शेतकऱ्यांनी सामूहिकरीत्या बियाणे खरेदी करून खर्च कमी करावा आणि बियाणे अनुदानासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले. प्रशिक्षणास प्रगतिशील शेतकरी, पाणी फाउंडेशनचे शेतकरी गट आणि कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# किशोर गटाच्या कबड्डी प्रशिक्षण शिबिरात ५० खेळाडूंचा सहभाग; २० खेळाडूंची पुढील प्रशिक्षण कॅम्पसाठी निवड

**रोहा । प्रतिनिधी**

सह्याद्री स्पोर्ट्स असोसिएशन, पोलादपूर यांच्या वतीने आयोजित किशोर गट मुलांचे कबड्डी प्रशिक्षण शिबिर साने गुरुजी विद्यालय, लोहारे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शनिवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी झालेल्या या शिबिरात तालुक्यातील विविध भागांतून आलेल्या ५० होतकरू खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या प्रशिक्षण शिबिरादरम्यान खेळाडूंच्या कबड्डीतील कौशल्यांची पाहणी करून त्यांना विविध डावपेच, आक्रमण, बचाव, चपळता आणि सांघिक खेळाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणातील कामगिरीच्या आधारे ५० खेळाडूंपैकी २० खेळाडूंची पुढील प्रशिक्षण शिबिरासाठी निवड करण्यात आली. त्यामुळे निवड झालेल्या खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



शिबिराला सह्याद्री स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष अमरजी सलागरे, कार्याध्यक्ष रमेश चव्हाण, विश्वस्त मोरे, दरेकर, ॲडव्होकेट हाटे, झाडाणे, मनिष शिंदे, साळवी, लीलाजी शेडगे आदी उपस्थित होते. तसेच पालकांसह महाड येथील काही खेळाडूंनीही उपस्थित राहून प्रशिक्षणार्थींना प्रोत्साहन दिले.शिबिरात सहभागी खेळाडूंमध्ये कबड्डीबद्दलची आवड, जिद्द आणि उत्साह दिसून आला. योग्य मार्गदर्शन व शिस्तबद्ध प्रशिक्षणाच्या माध्यमातून भविष्यातील दर्जेदार कबड्डीपटू घडविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर टीचर्स असोसिएशनची ९ ऑक्टोबरला बैठक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर टीचर्स असोसिएशनच्या वतीने प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता तुकूम, चंद्रपूर येथील परिजात अपार्टमेंट येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत दि. २८ व २९ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या संविधान विषयक सेमिनाराच्या आयोजनासंदर्भात चर्चा करण्यात येणार आहे. तसेच अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणाऱ्या विविध विषयांवरही चर्चा केली जाणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर टीचर्स असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी बैठकीस वेळेवर व आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुधाकर पेटकर, उपाध्यक्ष डॉ. संजय लाटेलवार, सचिव डॉ. प्रमोद शंभरकर आणि कोषाध्यक्ष डॉ. राजेश चिमणकर यांनी सदस्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# स्वातंत्र्याच्या ७९ वर्षांनंतर डोंगरगावात धावली एसटी

## आमदार देवराव भोंगळेंच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांचा जंगलवाटेचा थरारक प्रवास संपला

**गोंडपिपरी । नागेश इटेकर**

स्वातंत्र्य मिळून तब्बल ७९ वर्षे उलटली, तरीही दळणवळणाच्या सुविधेपासून वंचित असलेल्या गोंडपिपरी तालुक्यातील डोंगरगाव येथील ग्रामस्थांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार देवराव भोंगळे यांच्या विशेष पुढाकारामुळे डोंगरगावात पहिल्यांदाच एसटी बस धावली असून, यामुळे वर्षानुवर्षे सुरू असलेला गावकऱ्यांचा आणि विद्यार्थ्यांचा वनवास संपला आहे.

### विद्यार्थ्यांचा जीवघेणा प्रवास

गोंडपिपरी तालुक्यातील जंगल परिसरालगत असलेल्या डोंगरगावला आजवर नियमित बससेवा मिळाली नव्हती. परिणामी, धाबा व गोंडपिपरी येथे उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या ४० ते ५० विद्यार्थ्यांना दररोज जंगलवाटेने तब्बल चार किलोमीटर पायी प्रवास करावा लागत होता. या परिसरात वाघ व इतर हिंस्र वन्यप्राण्यांचा सतत वावर असल्याने, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला होता.या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवार, २८ सप्टेंबर रोजी डोंगरगावातील शेकडो विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी गोंडपिपरी आगार गाठले होते. 'जंगलवाटेचा प्रवास थांबवा, डोंगरगावला बस द्या' असा आक्रोश करत गावकऱ्यांनी बससेवा तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती.

### आमदारांनी स्वतः बसने केला प्रवास

ग्रामस्थांच्या या आंदोलनाची दखल घेत आमदार



देवराव भोंगळे यांनी बुधवारी, ७ ऑक्टोबर रोजी स्वतः गोंडपिपरी गाठले. त्यांनी डोंगरगाव-मक्ता-सुकवाशी या मार्गाने स्वतः बसने प्रवास करून रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली. प्रवासादरम्यान रस्त्याची दुरवस्था पाहून त्यांनी संबंधित विभागाला रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविण्याच्या कडक सूचना दिल्या. तसेच येत्या दोन दिवसांत डोंगरगावसाठी नियमित बससेवा सुरू करण्याचे निर्देश दिले. यावेळी त्यांच्यासोबत वाहतूक निरीक्षक राज वैद्य उपस्थित होते.गावाच्या रस्त्यावर पहिल्यांदाच लालपरी (एसटी बस) धावताना पाहून डोंगरगावच्या ग्रामस्थांचे डोळे पाणावले. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच गावात बस आल्याने महिला, वृद्ध आणि विद्यार्थ्यांनी जल्लोष केला. ७९ वर्षांची प्रदीर्घ प्रतीक्षा संपवून सुरक्षित प्रवासाचा मार्ग मोकळा करून दिल्याबद्दल डोंगरगावच्या वतीने आमदार देवराव भोंगळे यांचे जाहीर आभार मानण्यात आले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Wrd Warora.(442907) The editor oes not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts.